A Proceedings of 2nd National Conference on

Buddhist Philosophy

-A Present Day Need



NCBP-2018

February 02-03, 2018

Chief Editor

Murlidhar G. Chandekar

Editors

Rajesh S. Jaipurkar

Ajay P. Deshmukh

Gajanan G. Muley

Vinod K. Nagale

BUDDHIST STUDIES CENTER

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

AMRAVATI-444602 MS INDIA

NCBP- 2018

Vedprakash Dongaonkar

Proceedings of 2nd National Conference on

BUDDHIST PHILOSOPHY

- A Present Day Need

February 02-03, 2018

ISBN 978-93-84021-75-7

Chief Editor

Dr. Murlidhar G. Chandekar
Hon'ble Vice-Chancellor
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Editors

Dr. Rajesh S. Jaipurkar
Hon'ble Pro-Vice-Chancellor
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Dr. Ajay P. Deshmukh
Registrar
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Dr. Gajanan G. Muley
Coordinator, Buddhist Studies Center
Assistant Professor, Department of Physics
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Mr. Vinod K. Nagale
Co-coordinator, Buddhist Studies Center
Assistant Professor, Department of Zoology
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Published by

Registrar
Sant Gadge Baba Amravati University
Amravati-444602, MS, INDIA

Publishers assume no responsibility for the statements, opinions and subject matter advanced by contributors.

No part of this publication may be reproduced or utilized in any form or by any means without permission in writing from the publisher.

Marathi Section

Sr. No.	Title	Page No
32.	बौद्ध धम्माचे स्त्री विषयक विचार बाबुराव भिमराव जाधव	134-136
33.	महिला सशक्तिकरनाच्या अनुषंगाने बुद्धांचे कुटूंब विषयक विचार वेदप्रकाश डोणगावकर	137-140
34.	भगवान गौतम बुध्दाचे तत्वज्ञान व आक्रमक राष्ट्रवाद बि. डी. जामनेकर	141-143
35.	बुद्ध विचारधारा व वैचारिक लेखन स्वाती विठ्ठलराव चोरे	144-148
36.	बौध्द धर्मात स्त्रियांचे स्थान शिवप्रसाद पंजाबराव वायाळ	149-150
37.	विश्वशांतीसाठी बौद्ध धम्म राजेश व्ही. चौरपगार	151-154
38.	व्यावहारिक जिवनात - धम्मपद सुनिल रामभाऊ थोरात	155-156
39.	बौद्ध तत्वज्ञान काळाची गरज चंद्रशेखर लक्ष्मणराव कोरे	157-160
40.	BUDDHIST PHILOSOPHY OF PRESENT DAY -NEED सुरेश पी. आटोटे	161-163
41.	भारतातील बौद्ध धम्माचा इतिहास :एक चिकित्सक परिक्षण किशोर शेषराव चौरे	164-173
42.	बौद्ध धर्मांतील वैज्ञानिक दृष्टिकोन पांडुरंग गुलाबराव सवडदकर	174-177
43.	बुद्ध धम्म दीक्षा आणि स्त्रियांचे उत्थान कुंदन शहारे .	178-181

महिला सशक्तिकरनाच्या अनुषंगाने बुद्धांचे कुटूंब विषयक विचार

वेदप्रकाश डोणगावकर

एम. एस. गोटे महाविद्यालय, वाशिम

महिला सशक्तिकरन ही एक आधूनिक चळवळ आहे. परंतु या चळवळीचा इतिहास प्राचिन आहे. महिला सशक्तिकरनाचा सरळ व सामान्य अर्थ, 'महिलांमध्ये भौतिक व अध्यात्मिक, शारिरिक व मानसिक आत्मविश्वास वाढवीने.' असा आहे. परंतु प्रश्न असा आहे की, महिलांमध्ये हा आत्मविश्वास कोणी वाढवीला पाहिजे ? स्वतः महिलांनी की पुरुषांनी ? की समाज म्हणून या दोघांनी ? निश्चितच समाज म्हणून ही जबाबदारी स्त्री आणि पुरुष या दोघांची ही आहे. प्राचिन काळापासून आपल्या या समाजामध्ये सती, देवदासी या शिवाय स्त्री विषयक अनेक समस्या होत्या. परंतु विशेष बाब ही आहे की आजच्या या लोकशाहीच्या, कायद्याच्या युगातही हुंडाबळी, बलात्कार या सारख्या काही गंभीर स्वरुपाच्या समस्या पहावयास मिळतात. परिणामी जन्मानंतर आपली मुलगी सुरक्षीत तर राहील ना ? या प्रश्नाने त्रस्त होऊन पालक स्त्री भ्रूण हत्येचा पर्याय स्विकारतांनाचे चित्र पहावयास मिळत आहे. निश्चितच अशा या प्रसंगातून मानवी विकृती आणि मानवी सक्षमतेच्या अभावाची प्रचेती आपल्याला येऊ शकते. या शिवाय आपल्या समाजामध्ये 'वंशाचा दिवा' या अनुषंगाने स्त्रीची सतत अवहेलना होत आली आहे. परंतु स्त्री ही पुरुषाच्या तुलणेत कुठेही कमी नसेते हे राजमाता जीजाऊ, सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, लता मंगेशकर, मदर तरेसा, कल्पना चावला, प्रतीभाताई पाटिल, सायना नेहवाल, पी.सींधु यासारख्या महिलांकडे पाहून लक्षात घेतले पाहिजे. बुद्ध काळत राजा प्रसेनजित मुलगी झाल्यामूळे दुःखी झाला होता. तेव्हा त्याला बुद्ध म्हणाले होते की, 'भन्ते, मुलगीसुद्धा मुलापेक्षा उच्चत्तर आणि भव्यत्तर कार्य करु शकते.'[1] निश्चितच बुद्धांचे हे विचार महिला सशक्तिकरनासाठी दिपस्तंब ठरलेले आहेत. आपल्या सर्वांना ज्ञात आहे की, या आधुनिक युगाच्या सुरवातीला राजाराममोहन रॉयांपासून ते आंबेडकरांपर्यंतच्या अनेकांनी स्त्रीविषयक समस्यांना वाचा फोडली आणि त्या अनुषंगाने सुधारणात्मक कार्य ही केले. पण खऱ्या अर्थाने बुद्धांनी सांगितलेल्या वरील विचारांची त्यामागे प्रेरणा होती; असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

''मानवाला भोगाव्या लागणाऱ्या दुःखाची व कष्टाची कारणे कोणती ? दुःख नाहीसे कसे करता येईल ?''[2] या अनुषंगाने गौतमाला धम्माचे ज्ञान झाले होते. म्हणून गौतम हा 'बुद्ध' ठरला. बुद्ध हे गौतमाच्या रुपाने समोर आलेले पद आहे. ज्याचा अर्थ 'ज्ञानी' असा होतो.[3] अशा या ज्ञानी पुरुषाचा जन्म इ.स.पू. ५६३ मध्ये झाला. त्यांच्या आईचे नाव महामाया व वडीलांचे नाव शुद्धोदन होते. ते राजपुत्र होते. परंतु सामान्य राजपुत्राप्रमाणे त्यांचे आचरण नव्हते. ते विवाहीत होते. पण सामान्यांप्रमाणे तो सांसारिक नव्हता. यशोधरा ही त्यांची पत्नी होती. त्या दोघांना राहूल नावाचा मुलगा होता. गौतमामध्ये पुर्वीपासूनच नैतिकता भरभरुन होती. ते आदर्शवादी विचारांचे, चिंतणशील स्वभावाचे व्यक्ती होते. मानवी जीवनातील वार्धक्य, आजारपण, मृत्यू वैराग्य या विषयाकडे पाहुण ते विचार करायचे. वर्ण व्यवस्था, राज्य व्यवस्था इत्यादितून निमार्ण होणाऱ्या संघर्षामूळे ते व्यथीत व्हायचे. परिणामी वयाच २९ व्या वर्षी त्यांनी संसाराचा, राजसत्तेचा आणि समाज व्यवस्थेचा त्याग केला. परंतु कुटूंब, समाज आणि राजसत्तेच्या बाहेर राहून सुद्धा त्यानी या सर्व

ISBN: 978-93-84021-75-7

घटकांविषयी विचार मांडले आहेत. यापैकी कुटूंब विषयक विशेषतः 'पती-पत्नी' या घटकाविषयी बुद्धांचे विचार याठिकाणी पहाणे आवश्यक वाटते. कारन कुटूंब व्यवस्था ही महिला सशक्तिकरनाचा खऱ्या अर्थाने पाया ठरते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून, ''प्रजोत्पादन व संततीचे संगोपन या साठी निश्चित व दिर्घकालीन लैंगिक संबंधावर आधारलेला समुह म्हणजे कुटूंब होय.''[४] एकंदर आजच्या आपल्या कुटूंब पद्धतीमध्ये पती, पत्नी व संतती या तीन घटाकांचा प्रामुख्याने समावेश होतो. किंबहुना या तीन घटकांचा विचार केला जातो. परंतु आपल्या प्राचिन मानवी संस्कृतीमध्ये कधीकाळी स्वैर लैंगीक प्रवृतीच्या परिणामामूळे फक्त मातृ सत्ताक पद्धती अस्तित्वात होती. ज्यात पीता कोण ? हे निश्चितपणे सांगने कठीण होते. निश्चितच हा त्या कुटूंब पद्धतीचा मोठा दोष होता. परिणामी कालांतराने ही पद्धती लोप पावली आणि निश्चित पती व निश्चित पत्नी पद्धती उदयास आली. ज्यामूळे आपत्याला निश्चित पाल्ये मिळाली. विशेष म्हणजे ही पद्धती तत्कालीन परिस्थीतीमध्ये उपयूक्त ठरु लागल्याने ती पीढयानुपीढया चालू लागली व त्यातून संयूक्त कुटूंब पद्धती दृढ झाली. ज्यात आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकू, आत्या इत्यादी नातलग सुद्धा आपत्याला 'सहज' लाभायचे. त्या ठिकाणीची ही सर्व मंडळी एकमेकांसाठी आपल्या जीवनाची पराकाष्टा करायचे. अशाप्रकारची कुटूंबे आज अपवादाने पहावयास मीळतात. कारन वाढती लोकसंख्या, वाढती स्पर्धा इत्यादी अनेक कारनांमूळे ही संयुक्त कुटूंब पद्धती आज संपुष्टात येत आहे. किंबहुना ही भविष्यात लोप पावते की काय ? अशी शंका वेळोवेळी निर्माण होते. कारन 'व्यक्ती तितक्या प्रकृती' मूळे आज ही कुटूंबे 'कलहाचे केंद्र'[५] सुद्धा ठरली आहेत. परिणामी आजच्या या औद्योगिक विकासाच्या युगामध्ये पती-पत्नी आणि त्यांची संतती ऐवढेच, विभक्त कुटूंब पद्धती वाढत चालली आहे. पुर्वीप्रमाणे कामाचे विभाजन, सुरक्षीतता या सारख्या बाबींचा याठिकाणी अभाव दिसून येतो. या उलट कामाचा व्याप, असुरक्षीतता, गैरसोय ही सामान्ये दोष स्पष्ट जाणवत आहेत. ज्यामूळे अशा या कुटूंबांमध्ये तान-तणाव, संघर्ष वाढत आहे, तो विकोपाला जात आहे. परिणामी ही विभक्त कुटूंब पद्धती सुद्धा उदवस्थ होत असल्याचे चित्र पहावयास मीळत आहे(उदा. घटस्फोट). तेव्हा अशा या दोन्ही प्रकारच्या कुटूंब पद्धतीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी, त्या ठिकाणी असलेल्या पती-पत्नी या दोन प्रमुख घटकाची कर्तव्य निश्चित करने आज आवश्यक बनले आहे. या अनुषंगाने बुद्धांनी सुचविलेल्या काही कर्तव्यांचा (वागणूक) पुढील प्रमाणे विचार करता येईल.

पतीने पार पाडावयाची कर्तव्ये :- १) पत्नीला सौजन्याने व प्रेमाने वागवावे २) पत्नीचा तिरस्कार करु नये ३) पत्नीशी निष्ठेने वर्तन करावे ४) आपले अधिकार पत्नीला द्यावेत ५) पत्नीला आवश्यक अशी वस्त्राभरणे पुरवावी.

पत्नीने पार पाडावयाची कर्तव्ये :- १) पतीचे घर उत्तम रीतीने व व्यवस्थितपणे चालवावे २) नातलगांचे चांगले आतिथ्य करावे ३) पतीशी निष्ठेने वागावे ४) संपत्तीची व मालमत्तेची नीट काळजी घ्यावी ५) आळसात न राहता उद्योगशीलता वाढवावी.[६]

वास्तविक पहाता बुद्धांनी आपले सबंध विचार मानव जातीला अनुसरुन व्यक्त केले आहेत. असे करीत असतांना त्यानी भिख्खूंसाठी व उपासकांसाठी म्हणजेच सांसारिक लोकांसाठी वेगवेगळे विचार सांगितले आहेत. आज सांसारिक मानवाची प्रवृत्ती भोगवादी बनली आहे. अधिकाधिक प्रमाणात स्वतःच्या इच्छा पुर्ण करण्यासाठी तो धडपडत आहे. त्यातही त्याच्या अनेक इच्छा निरर्थक आहेत. परिणामी तो स्वतःच स्वतःच्या दुःखाचे कारन बनत चालला आहे. म्हणून बुद्धाने इच्छांचे दमन करण्यासंदर्भात उपदेश केला आहे. मात्र बुद्ध सरसकटपणे सर्वच इच्छांचे दमण करावे असे अजिबात म्हणत

ISBN: 978-93-84021-75-7

नाहीत. या संदर्भात ते 'मध्यम मार्ग' सुचवितात. हा मध्यम मार्ग सहज समजावा म्हणून ते वीणा वाद्याचे उदाहरण ठेवतात. ते म्हणतात, ''वीणेच्या तारांमधून मधुर सुर निघण्यासाठी त्यांना विशिष्ट प्रमाणातच बांधून ठेवावे लागते. त्या फार तानल्या तर तुटण्याचा वा कर्कश ध्वनी निघण्याचा संभव असतो व फार सैल बांधल्या तर सूरच निघणार नाहीत ; म्हणून वीणेच्या तारा ठरावीक प्रमाणतच ताणून बांधावयाचे असते. फार तंग नकोत तशा त्या फार सैलही असता कामा नये.''[७] अशा प्रकारे मानवाने सुद्धा आपल्या इच्छांना समतोल अवस्थेत ठेवले पहिजे. अन्यथा मानवी जीवनात दुःखाशिवाय काहीही उत्पन्न होणार नाही. म्हणजेच कुटूंब हे कुटूंब रहाणार नाही की, मानव हा मानव रहाणार नाही ! अशी आवस्था निर्माण होऊ शकते. पण असे असतांना सुद्धा आजच्या आपल्या कुटूंब व्यवस्थेत प्रत्येक व्यक्ती अकारन आपल्या इच्छा वाढऊन बसला आहे. तो कुटूंबातील इतर सदस्यांकडून अकारन अपेक्षा करीत चालला आहे. पण प्रत्येक व्यक्ती प्रत्येकाची इच्छा, प्रत्येकाची अपेक्षा कशा पुर्ण करु शकेल ? त्यालाही काही मर्यादा असतात का नाही ? याचा विचार करुन प्रत्येकाने आपल्या इच्छा वा आपेक्षांना वाचा फोडली पाहिजे. किंबहुना त्यानुसार वागले पाहिजे. खऱ्या अर्थाने बुद्धांनी सांगितलेल्या मध्यम मार्गाची ही पुर्व अटच् आहे. या वरुन आपल्याला असे म्हणता येईल की, बुद्धांचा मध्यम मार्ग हा मानवाला सांसारिक जीवनापासून परावृत्त करणारा नाही. तर उलट तो संसारात राहून 'स्व नियंत्रण' ठेवण्यास मदत करणारा, कर्तव्यभिमुख बनविनारा आहे.

याशिवाय आजच्या कुटूंब व्यवस्थेचे अवलोकन केले असता पहावयास मिळते की, पती किंवा पत्नी हे दोघेही कमी अधिक प्रमाणात एकमेकांना आपल्यातच गुंतवून ठेवण्याचा किंबहुना समाजापासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. एखादी पत्नी पुढचे शिक्षण किंवा नैकरी करु इच्छित असेल तर तीच्यावर मर्यादा घातल्या जातात. शिवाय एखादा कर्ता पती आपल्या अप्तजणांसाठी, मीत्र परिवारासाठी, समाजातील उपेक्षीत-गरजूंसाठी मदत म्हणून काही करु इच्छित असेल तर त्याच्यावार सुद्धा निरनिराळ्या पद्धतीने बंधने लादली जातात. वास्तविक पहाता प्रत्येकजण मसीह नसतो. प्रत्येकजण समाजसेवक नसतो. प्रत्येकजण बुद्ध नसतो. पण प्रत्येकजण हा समाजशिल प्राणी असतो. कळत-नकळत तो समाजाचा ऋणी असतो. तेव्हा हे सामाजिक भान लक्षात घेऊन प्रत्येकाने स्वतःशिवाय इतरांसाठी काहीतरी करण्याची वृत्ती जोपासली पहीजे आणि ही वृत्ती विकसीत करण्यासाठी जीवनसाथी म्हणून पती-पत्नी या दोन्ही घटकाने एकमेकांना प्रोत्साहीत केले पाहीजे. या संदर्भात बुद्धाच्या जीवनातील एका घटनेला अनुसरुन त्याची पत्नी यशोधरेचा याठिकाणी आवर्जून उल्लेख करावा लागेल. बुद्ध जेव्हा वैराग्याच्या पावित्र्यात होते तेव्हा यशोधरेने साधा त्याला आडवण्याचा ही प्रयत्न केला नाही. उलट, ''तुमच्या अनुपस्थितीत तुमच्या आई वडीलांची, आपल्या मुलाची काळजी घेईल !''[८] या आशयाचे वचन दिले. निश्चितच त्यात यशोधरेचा फार मोठा त्याग होता. अशा प्रकारचा त्याग सर्वांना शक्य नाही. पण जीतक्या प्रमाणात शक्य होईल तीतक्या प्रमाणात जर प्रत्येक पती-पत्नीने कर्तव्य भावना जोपासली तर निश्चितच मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनातील दुःख, दारिद्रय कामी करण्यास मदत होईल. यशोधरेचा जो त्याग होता त्यामागे तीचा आत्मविश्वास देखिल होता हे या ठिकाणी आपन लक्षात घेतले पाहिजे. आणि खऱ्या अर्थाने अशा प्रकारचा हा आत्मविश्वासच महिलांना सशक्त बनविण्यास सहाय्यक ठरु शकतो.

एकंदर महिला सशक्तिकरनासाठी स्वतः महिलेने आणि तीच्या पतीने वा तीचे कुटूंबीयांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

ISBN: 978-93-84021-75-7

तळटीप :-

[१] पहा, महिला सशक्तिकरन या विषयावर २६.११.२०११ रोजी रामकृष्ण महाविद्यालय, दर्यापूर द्वारा आयोजित राष्ट्रिय अधिवेशनातली स्मरणीकेत, पृ.६६४

[२] बुद्ध आणि त्यांचा धम्म सारतत्त्व, डॉ. यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर पृ. ३०

[३] तत्रैव पृ. ३०

[४] समाजशास्त्र, प्रदिप आगलावे, साईनाथ प्रकाशन, नागपूर पृ. १०३

[५] भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या, रा.र. लोटे, पींपळापुरे...नागपूर पृ.८३

[६] भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास,खंड २, ग.ना.जोशी, शुभदा सारस्वत प्रकाशन, पूणे १९९४, पृ १४६-१४७

[६] तत्रैव, पृ. १४०

[८] उ.नी. डॉ. यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर पृ. १९

ISBN: 978-93-84021-75-7

BUDDHIST STUDIES CENTER

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
AMRAVATI-444602 MS INDIA

2nd National Conference on

Buddhist Philosophy

-A Present Day Need

NCBP-2018

February 02-03, 2018

Certificate

This is to Certify that,

Prof./Dr./Mr./Ms./Mrs. Vedprakash Dongaonkar *of* M.S. Gote College, Washim *has participated (Reg. No.:* 036*) and ~~delivered Invited Talk/Chaired Technical Session/Evaluated Paper Presentations~~/ Presented Paper at the National Conference on "Buddhist Philosophy-A Present Need, NCBP-2018" (महिला सशक्तिकरणाच्या अनुषंगाने बुद्धाचे कुटुंब विषयक विचार) organized by Buddhist Studies Center, Sant Gadge Baba Amravati University, Amravati during February 02-03, 2018.*

Mr. Vinod K. Nagale
Organizing Secretary

Dr. Gajanan G. Muley
Convener